.nagpur

# NMC e NEWS LETTER

सप्टेंबर २०१८

/nmcngp/ /ngpnmc/ www.nmcnagpur.gov.in/ http://news.nmcnagpur.org/

## थोडक्यात

### सामान्यांना उत्तम सेवा देणे हीच मनपा अधिकाऱ्यांची भावना : आयुक्त रवींद्र ठाकरे

कार्यकारी अभियंता भुते यांच्यासह १९ अधिकारी–कर्मचाऱ्यांना निरोप

नागपूर : नागपूर महानगरपालिकेत काम करणारा प्रत्येक अधिकारी–कर्मचारी हा सेवा भावनेनेच काम करतो. शहरातील सामान्य नागरिकांना उत्तम सेवा देणे हीच अधिकारी–कर्मचाऱ्यांची भावना असते. येथील प्रत्येक कर्मचारी समस्या सोडविण्यास तत्पर असतो. अशात चांगल्या अधिकारी–कर्मचाऱ्यांची सेवानिवृत्ती ही सेवाकार्यात मोठी पोकळी निर्माण करणारी ठरते, असे भावोद्गार मनपाचे प्रभारी आयुक्त रवींद्र ठाकरे यांनी काढले.नागपूर महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता स्थावर अधिकारी आर. एस. भुते, कनिष्ठ अभियंता एस.डी. तारे यांच्यासह १९ अधिकारी–कर्मचारी यांच्या सेवानिवृत्ती निरोप समारंभात ते बोलत होते. यावेळी अपर आयुक्त अझीझ शेख, उपायुक्त राजेश मोहिते, नगरसेवक मनोज सांगोळे, मुख्य अभियंता मनोज तालेवार, सहायक आयुक्त (सामान्य प्रशासन) महेश धामेचा, कार्यकारी अभियंता मोती कुकरेजा, गिरीश वासनिक, राजेश भूतकर, संजय जयस्वाल, कनिष्ठ अभियंता राठोड, तांत्रिक सल्लागार (नद्या व सरोवरे) मो. इसराईल, सहायक आयुक्त राजू भिवगडे, राजेश कराडे, निगम अधीक्षक मदन सुभेदार, सहायक अधीक्षक (वित्त) दत्तात्रय डहाके, सहायक अधीक्षक (सा.प्र.) मनोज कर्णिक, जनसंपर्क अधिकारी अशोक कोल्हटकर, सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता डी.डी. जांभुळकर उपस्थित होते. पुढे बोलताना प्रभारी आयुक्त रवींद्र ठाकरे म्हणाले, असंख्य अडचणींचा उल्लेख न करता मनपाचे अधिकारी–कर्मचारी अविरत काम करीत असतो. येथील सर्वांमध्ये चांगले गुण आहेत. फक्त व्यासपीठ मिळत नाही. शक्ती आहे. आता इच्छाशक्ती वाढवायची आहे. मनपा कर्मचाऱ्यांना आता नव्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी प्रशिक्षित करण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.

### डेंग्यूच्या नावावर पैसे उकळणाऱ्या खासगी रुग्णालयांवर कारवाई करा!

नागपूर : डेंग्यूमुळे नागरिकांच्या मनात भीती असून साधारण तापाच्या उपचारासाठी खासगी दवाखान्यात जाणाऱ्या रुग्णांना डेंग्यूची भीती दाखवून रुग्णांकडून पैसे उकळणाऱ्या खासगी रुग्णालयांवर कारवाई करा, असे निर्देश आरोग्य समिती सभापती मनोज चापले यांनी दिले.आरोग्य समितीच्या झोननिहाय बैठकीअंतर्गत सतरंजीपुरा व लकडगंज झोन कार्यालयात आढावा बैठक घेण्यात आली. बैठकीला आरोग्य समिती सभापती मनोज चापले यांच्यासह सतरंजीपुरा झोनच्या सभापती यशश्री नंदनवार, नगरसेवक संजय महाजन, संजय चावरे, नगरसेविका अभिरुची राजगिरे, शकुंतला पारवे, वंदना चांदेकर, सतरंजीपुरा झोनचे सहायक आयुक्त प्रकाश वराडे, लकडगंज झोनमध्ये नगरसेवक प्रदीप पोहाणे, अनिल गेंडरे, नगरसेविका मनिषा धावडे, सरिता कावरे, जयश्री रारोकर, झोनचे आरोग्य अधिकारी डॉ. मोवाडे उपस्थित होते. खासगी रुग्णालयांकडून मोठ्या प्रमाणात डेंग्यूच्या भीतीचा प्रचार केला जात आहे. रुग्णांकडून जास्तीत जास्त पैसे उकळण्यासाठीचा हा खासगी रुग्णालयांचा फंडा आहे. साधारण तापासाठी तपासणीकरिता खासगी रुग्णालयात रुग्ण गेल्यास त्याला डेंग्यूचे लक्षण असल्याचे सांगून भरती केले जाते. त्यानंतर महागड्या चाचण्या करून रुग्णांची आर्थिकदृष्ट्या लूट केली जाते. मात्र खासगी रुग्णालयांमधून ज्या प्रकारे भीतीचा प्रचार केला जात आहे, त्यामुळे नागरिकांमध्ये अधिकच भीतीचे वातावरण निर्माण होत आहे. अशा खासगी रुग्णालयांकडून डेंग्यूबाबत महानगरपालिकेला अहवालही सादर केला जात नाही. या खासगी रुग्णालयांना अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात यावे व डेंग्यूच्या नावावर नागरिकांची लूबाडणूक करणाऱ्या खासगी रुग्णालयांवर कारवाई करण्यात यावे, असे यावेळी आरोग्य समिती सभापती मनोज चापले यांनी निर्देशित केले. बैठकीमध्ये आरोग्य सभापती मनोज चापले यांनी सतरंजीपुरा व लकडगंज झोनमधील डेंग्यूच्या उपाययोजनांचा आढावा घेतला.

## खेळाकडे करिअर म्हणून पाहा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



### महापौर चषक सबज्यूनिअर गर्ल्स नॅशनल बॉक्सिंग स्पर्धेचा समारोप

नागपूर : आज खेळ म्हणजे केवळ विरंगुळ्याचे साधन नाही. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक खेळाडू आज उल्लेखनीय कामगिरी करून नावलौकीक करीत आहेत. मुलांच्या खेळाकडे वळण्यामुळे अनेक पालकांना त्यांच्या अभ्यासाची भीती असते. मात्र पालकांनी खेळातही भविष्य आहे हे लक्षात घेऊन मुलांना प्रोत्साहन देण्याची गरज आहे. खेळ व खेळाडूंसाठी महाराष्ट्र शासनाने अनेक योजना सुरू केल्या आहेत. त्यातून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना थेट नोकरी देणे सुरू आहे. त्यामुळे खेळातूनही करिअर घडविता येते ही बाब लक्षात घेऊन पालकांनी व मुलांनीही खेळाकडे करिअर म्हणून पाहण्याची गरज आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.नागपूर महानगरपालिका, नागपूर महानगर बॉक्सिंग असोसिएशन, बॉक्सिंग फेडरेशन ऑफ इंडिया व महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित देशातील पहिली महापौर चषक सबज्यूनिअर गर्ल्स नॅशनल बॉक्सिंग स्पर्धेच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते.समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून राज्याचे ऊर्जा व जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार सुधाकर कोहळे, महापौर नंदा जिचकार, उपमहापौर दीपराज पार्डीकर, स्थायी समिती सभापती वीरेंद्र कुकरेजा, सत्ता पक्षनेते संदीप जोशी, ज्येष्ठ नगरसेवक व आयोजन समितीचे अध्यक्ष दयाशंकर तिवारी, क्रीडा समिती सभापती नागेश सहारे, शिक्षण समिती सभापती दिलीप दिवे, स्थापत्य व प्रकल्प विशेष समिती सभापती संजय बंगाले, क्रीडा समिती उपसभापती प्रमोद तभाने, महिला व बालकल्याण समिती सभापती प्रगती पाटील, लक्ष्मी नगर झोन सभापती प्रकाश भोयर, नेहरू नगर झोन सभापती रिता मुळे, नगरसेवक किशोर जिचकार, निशांत गांधी, नगरसेविका वर्षा ठाकरे, स्नेहल बिहारे, चेतना टांक, पल्लवी शामकुळे, मनिषा कोटे, मिनाक्षी तेलगोटे, सोनाली कडू, रुपा रॉय, जिल्हाधिकारी अश्विन मुदगल, उपजिल्हाधिकारी रवींद्र कुंभारे, बॉक्सिंग फेडरेशन ऑफ इंडियाचे संस्थापक असीत बॅनर्जी, महासचिव जय कवळी, स्पर्धा निरीक्षक सी.बी. राजे, महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनचे महासचिव भरत व्हावळ, भारतीय बॉक्सिंग संघाचे माजी व्यवस्थापक के.के. बोरो, अर्जुन पुरस्कार विजेते डी. एफ. आय. चे मुख्य निवडकर्ता कॅप्टन गोपाल देवांग, अर्जुन पुरस्कार विजेते एस. जयराम, मनोज पिंगळे, नागपूर जिल्हा बॉक्सिंग असोसिएशनचे अध्यक्ष व महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनचे उपाध्यक्ष सज्जड हुसैन, नागपूर जिल्हा बॉक्सिंग असोसिएशनचे सचिव अरुण बुटे, राजेश देसाई, संतोष दत्ता, अनुराग वर्मा, पारस कोतवाल, डॉ. विजय इंगोले, विभागीय सचिव व बॉक्सिंग प्रशिक्षक गणेश पुरोहित, नागपूर जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश पुंड, रेमन्ड दारूवाला, बाबा ठाकुर, अकरम पाथ, दिनेश दानारकर उपस्थित होते. पुढे बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मुलींच्या मनगटात खूप बळ असून याच मुली जागतिक स्तरावर देशाचा लौकीक करतील. ज्याप्रमाणे मेरी कोमचे जीवन आदर्श ठरले आहे व तोच आदर्श घेऊन मुली बॉक्सिंग रिंगमध्ये उल्लेखनिय कामगिरी करीत आहेत. अशा स्पर्धा खेळाडूंसाठी महत्वाचे व्यासपीठ ठरत असून येत्या काळात जागतिक स्तरावर देशाचे नाव लौकीक करणा–या अनेक 'मेरी कोम' आपल्याकडे असतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी खेळाडूंना प्रोत्साहन देता यावे व तळागाळातील खेळाडू पुढे यावेत यासाठी 'खेलो इंडिया' अभियान सुरू केले. त्याच धर्तीवर महाराष्ट्र सरकारनेही खेळाडूंसाठी विविध योजना सुरू केल्या आहेत. येत्या ऑलिम्पिकमध्ये देशातील जास्तीत जास्त खेळाडूंना सहभागी होता यावे, यासाठी खेळाडू निवडीची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, या खेळाडूंना विशेष प्रशिक्षण देण्यात येईल. यंदा आशियाई क्रीडा स्पर्धांमध्ये देशातील खेळाडूंनी आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी केली आहे. हा प्रगतीचा आलेख पुढेही वाढवत ठेवायचा आहे, त्यासाठी महाराष्ट्र शासन नेहमीच खेळाडूंच्या सोबतीला आहे. देश व आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करून देशाचे व राज्याचे नाव लौकीक करणा–या २४ खेळाडूंना मागील महिन्यात महाराष्ट्र सरकारतर्फे शासकीय नोकरीत रूजू करण्यात आले असल्याचेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.



### डॉ. श्रीकांत जिचकार यांचे जीवनकार्य प्रेरणादायी : महापौर

भरतनगर चौक झाला आता

**ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार चौक**

नागपूर : ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार यांच्या ज्ञानाची आणि कार्याची महती मोठी आहे. राजकारण्यांसाठी ते प्रेरणा होते. समाजकारण्यांसाठी ते आदर्श होते आणि बुद्धीवंतांसाठी ते ज्ञानाचा झरा होते. हा ज्ञानाचा खळखळता झरा कमी वयात थांबला असला तरी त्यांची कीर्ति आजही सर्वविदित आहे. अमरावती मार्गावरील भरत नगर चौकाचे नामकरण त्यांच्या नावाने करणे हा नागपूर शहरासाठी भाग्याचा क्षण आहे, असे प्रतिपादन महापौर नंदा जिचकार यांनी केले.भरत नगर चौकाला ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार यांचे नाव देण्यात आले. यानिमित्त नागपूर महानगरपालिकेतर्फे आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी आमदार सुधाकर देशमुख, आमदार सुधाकर कोहळे, श्रीमती राजश्री जिचकार, महिला व बालकल्याण समिती सभापती प्रगती पाटील, स्थापत्य व प्रकल्प समिती सभापती संजय बंगाले, कर व कर आकारणी समितीचे सभापती संदीप जाधव, धरमपेठ झोन सभापती प्रमोद कौरती, ज्येष्ठ नगरसेवक सुनील अग्रवाल, सुनील हिरणवार, नगरसेवक निशांत गांधी, किशोर जिचकार, नगरसेविका शिल्पा धोटे, याज्ञवल्क जिचकार, जयप्रकाश गुप्ता उपस्थित होते. महापौर नंदा जिचकार पुढे बोलताना म्हणाल्या, डॉ. श्रीकांत जिचकार यांचे जीवन इतरांसाठी मार्गदर्शक बनले. त्यांची ख्याती केवळ महाराष्ट्र किंवा भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात होती. प्रत्येक विषयातील, प्रत्येक क्षेत्रातील त्यांचे ज्ञान अफाट होते. त्यांच्या आठवणी, स्मृती कायम राहण्यासाठी नागपूर महानगरपालिकेने भरतनगर चौकाचे नामकरण ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार असे करून त्यांच्या कार्याचा वसा चिरकाल स्मरणात राहण्यासाठी अल्पसा प्रयत्न केला आहे. त्यांच्या कार्याची अमूल्य ठेव आम्ही जोपासल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले.

### फुटाळ्यालगतच्या भूमिगत रस्त्याला हेरिटेज समितीची तत्त्वत: मंजुरी

नागपूर : फुटाळा तलावालगत होणाऱ्या सौंदर्यीकरणांतर्गत भूमिगत रस्ता आणि प्रेक्षकदीर्घेच्या बांधकामाला हेरिटेज संवर्धन समितीने तत्त्वत: मंजुरी प्रदान केली आहे. नागपूर महानगरपालिका मुख्यालयातील नगर रचना विभागाच्या कक्षात शनिवारी (ता. २९) पार पडलेल्या बैठकीत सदर मंजुरी देण्यात आली होती.महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लिमिटेडचे अतिरिक्त महाव्यवस्थापक (नियोजन) यांनी फुटाळा तलावालगत भूमिगत रस्ता आणि प्रेक्षकदीर्घा बांधकामाला हेरिटेज संवर्धन समितीचे ना–हरकत पत्र मिळण्यासाठी पत्र सादर केले होते. या पत्राच्या अनुषंगाने हेरिटेज संवर्धन समितीच्या बैठकीत सदर विषय चर्चेला आला होतो. महामेट्रोच्या अधिकाऱ्यांनी सदर बांधकामासंदर्भातील सर्व कागदपत्रे समितीकडे सादर केले. यावेळी सदर बांधकामाचे सादरीकरणही त्यांनी केले. या बांधकामामुळे हेरिटेज वास्तूंच्या यादीत असलेल्या फुटाळा तलावाला कुठलाही धोका निर्माण होणार नाही. त्यासंदर्भात संबंधित सर्व विभागांशी पत्रव्यवहार झाल्याची माहिती मेट्रोच्या अधिकाऱ्यांनी दिली. शहराच्या सौंदर्यात भर घालणारा आणि पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या या विषयाला समितीने तत्त्वत: मंजुरी प्रदान केली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी प्रभारी अध्यक्ष तथा नागपूर महानगरपालिकेचे उपायुक्त राजेश मोहिते होते. समितीचे सदस्य स्ट्रक्चरल अभियंता पी. एस. पाटणकर, एल.ए.डी. महाविद्यालयाच्या प्रा. डॉ. नीता लांबे, नागपूर विद्यापीठाच्या इतिहास विभागाच्या प्र–पाठक डॉ. शुभा जोहरी, नागपूर वस्तु संग्रहालयाचे क्युरेटर विराग सोनटक्के, नगररचना विभाग नागपूर शाखेच्या सहायक संचालक सुप्रिया थूल, नागपूर सुधार प्रन्यासचे अधीक्षक अभियंता सुनील गुज्जलवार, नगररचनाकार श्री. प्रवीण सोनारे उपस्थित होते.

### भाविकांसाठी सर्व सोयी–सुविधा उपलब्ध करा : महापौर

**ताजबाग उर्स तयारीचा घेतला आढावा : देशभरातून लाखो भाविकांचा असतो सहभाग**

नागपूर : ताजबागमध्ये ३ ऑक्टोबरपासून उर्स सुरू होत आहे. देशभरातून लाखो भाविक उर्समध्ये सहभागी होत असतात. त्यासाठी महापालिका प्रशासनाद्वारे करण्यात आलेल्या व्यवस्थेचा आढावा शुक्रवारी (ता.२८) महापौर नंदा जिचकार यांनी मनपा मुख्यालयातील डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती सभागृहात घेतला.बैठकीला उपमहापौर दीपराज पार्डीकर, प्रभारी आयुक्त रवींद्र ठाकरे, मनपातील सत्तापक्ष प्रतोद दिव्या धुरडे, वैद्यकीय सेवा व आरोग्य समिती सभापती मनोज चापले, क्रीडा समिती सभापती नागेश सहारे, नेहरूनगर झोन सभापती रिता मुळे, नगरसेविका स्नेहल बिहारे, ज्येष्ठ नगरसेवक सुनील अग्रवाल, अतिरिक्त आयुक्त राम जोशी, अतिरिक्त आयुक्त अझीझ शेख, उपायुक्त राजेश मोहिते, कार्यकारी अभियंता (विद्युत) संजय जैस्वाल, आरोग्य अधिकारी (स्वच्छता) डॉ.प्रदीप दासरवार, मुख्य अग्निशमन अधिकारी राजेंद्र उचके, नेहरूनगर झोन सभापती राजेश कराडे, वैद्यकीय अधिकारी डॉ.विजय जोशी, ताजबागचे प्रशासक जी.एम.कुबडे, सचिव अब्दुल रज्ञाक ताजी प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी महापौरांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून आढावा घेतला. ताजबाग परिसरात सद्यस्थितीत सुरू असलेल्या पाणीपुरवठा व्यतिरिक्त उर्स कालावधीत दोन हजार लिटर क्षमतेच्या एकूण आठ पी.व्ही.सी. पाण्याच्या टाक्या विविध ठिकाणी ठेवण्यात येणार असल्याची माहिती जलप्रदाय विभागाकडून देण्यात आली. उर्स कालावधीत भाविकांना पिण्याच्या पाण्यासाठी गैरसोय होऊ नये याकरिता दररोज एकूण ६० टँकरने पाणी पुरवठा करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. पाण्याचा प्रश्नावर बोलताना महापौरांनी पिण्याच्या पाण्यासंदर्भात कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात याव्या, असे आदेश दिले. स्वच्छता विभागाद्वारे महिला व पुरूषांसाठी प्रत्येकी ५० अस्थायी स्वरूपाचे शौचालय बांधण्यात येणार असल्याची माहिती आरोग्य अधिकारी (स्वच्छता) डॉ.प्रदीप दासरवार यांनी दिली. याव्यतिरिक्त चार मोबाईल शौचालयाची व्यवस्था परिसरात करण्यात येणार आहे. स्वच्छता विभागाचे कर्मचारी तीन शिफ्टमध्ये २४ तास काम करणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. दोन ठिकाणी ओपीडीची व्यवस्था करण्यात यावी, असे निर्देश महापौर नंदा जिचकार यांनी दिले. उर्स दरम्यान ३, ७ आणि १० ऑक्टोबरला भाविकांची गर्दी मोठ्या प्रमाणावर असणार असल्याची माहिती ताजबाग प्रशासनाद्वारे देण्यात आली. .

## विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला पालक, शिक्षकांनी पंख द्यावे!

**शिक्षण सभापती प्रा. दिलीप दिवे : महापालिका शाळेत 'पायलट शाळा' उपक्रमांतर्गत पालक सभा**




नागपूर : महानगरपालिकेच्या शाळांमधून देण्यात येणाऱ्या शिक्षणाचा दर्जा आता बदलला आहे. मात्र आता यापुढे जाण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांमध्ये अनेक सुप्त गुण असतात. त्यांच्यातील कल्पकता आपल्याला अवाक करणारी असते. अभ्यासाव्यतिरिक्त इतर कलांमध्ये निपुण विद्यार्थ्यांना फक्त अभ्यासासाठी बाध्य न करता शिक्षकांसह पालकांनीही त्यांच्यातील कल्पकतेला पुढे नेण्यासाठी पुढाकार घ्यावा, त्यांच्या कल्पनेला पंख द्यावे, असे प्रतिपादन शिक्षण समिती सभापती प्रा. दिलीप दिवे यांनी केले.मनपाच्या 'पायलट शाळा' उपक्रमांतर्गत शनिवारी (ता. २९) विवेकानंदनगर हिंदी माध्यमिक शाळेत पालक सभा आयोजित करण्यात आली. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी त्यांच्यासमवेत लक्ष्मीनगर झोनच्या सहायक आयुक्त सुवर्णा दखने, शाळेच्या मुख्याधापिका रजनी वाघाडे, श्री.गाढवे प्रामुख्याने उपस्थित होते. नागपूर महानगरपालिकेच्या तीन शाळांमध्ये पायलट शाळा या उपक्रमाअंतर्गत पालक सभा घेण्यात आली. जयताळा येथील एकात्मता शाळेतही पालक सभेचे आयोजन करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ नगरसेवक प्रफुल्ल गुडधे, अपर आयुक्त राम जोशी प्रामुख्याने उपस्थित होते. सभेमध्ये मनपाच्या शिक्षणाधिकारी संध्या मेडपल्लीवार, उच्च प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका अश्विनी फेद्देवार, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तुकाराम लांडगे, झोन शाळा निरीक्षक संजय दिघोरे आदी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांना विद्यार्थ्यांनी टाकाऊ वस्तूंपासून तयार केलेल्या शोभेच्या वस्तू देऊन सन्मानित करण्यात आले यावेळी बोलताना प्रफुल्ल गुडधे म्हणाले, महानगरपालिकेच्या बऱ्याचशा शाळांची स्थिती आता सुधारली आहे. या शाळांमध्ये पायभूत सुविधांचा विकास होत आहे. मात्र शाळांमध्ये पायाभूत सुविधांसह शाळांमध्ये दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी त्या दर्जाच्या शैक्षणिक सुविधाही मिळणे आवश्यक आहे, असे मत नगरसेवक प्रफुल गुडधे यांनी व्यक्त केले. अपर आयुक्त राम जोशी यावेळी बोलताना म्हणाले, नागपूर महानगरपालिकेमध्ये २० माध्यमिक व २९ प्राथमिक शाळा आहेत. यापैकी पालकांचा उत्तम सहभाग असलेल्या २३ शाळांची 'पायलट शाळा' उपक्रमासाठी निवड करण्यात आली. यामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होईल व याची प्रेरणा घेऊन इतरही शाळा असे उपक्रम राबवून कार्यरत व्हाळव्यात, हा या उपक्रमाचा उद्देश आहे, असे अपर आयुक्त राम जोशी म्हणाले. मनपाच्या अनेक शाळांची स्थिती अजूनही फारसी चांगली नाही. या शाळांसाठी येत्या १ डिसेंबरपासून सर्व शाळांमध्ये माजी विद्यार्थी संमेलन आयोजित करण्यात येणार आहे. या संमेलनात शाळेविषयी कृतज्ञता असलेल्या विविध पदावर कार्यरत माजी विद्यार्थ्यांना एकत्र येऊन आपल्या शाळेविषयी ऋण फेडता येईल, असेही अपर आयुक्त राम जोशी यांनी सांगितले.

# थोडक्यात...



## गोवर व रुबेला उच्चाटनासाठी मनपातर्फे नोव्हेंबरमध्ये लसीकरण मोहीम

### ३० ठिकाणी मुख्याध्यापकांचे प्रशिक्षण

नागपूर : गोवर व रुबेला या रोगांच्या उच्चाटनासाठी राज्य सरकारने कंबर कसली आहे. राज्य शासनाच्या निर्देशानुसार येत्या नोव्हेंबर महिन्यापासून नागपूर महानगर पालिकेच्यावतीने लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. लसीकरण मोहिमेंतर्गत शहरातील महानगरपालिकेच्या शाळांसह सरकारी व खासगी शाळा तसेच ९ ते १५ वर्ष वयोगटातील सर्व मुलांना एम.आर. लस देण्यात येणार आहे. यामोहिमेसाठी शहरातील शिक्षण विभागातील यू.आर.सी.१ (प्राथमिक) व यू.आर.सी.२ (माध्यमिक) शाळा केंद्रांमध्ये आणि महानगरपालिका शिक्षण विभाग अशा एकूण ३० ठिकाणी मुख्याध्यापकांचे प्रशिक्षण घेण्यात आले. प्रशिक्षणाला शहरातील सर्व शाळांचे मुख्याध्यापक प्रामुख्याने उपस्थित होते. आरोग्य अधिकारी (दवाखाने) डॉ. अनिल चिव्हाणे, जागतिक आरोग्य संघटनेचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. साजिद खान, नोडल अधिकारी डॉ. सुनील घुरडे, डॉ. नंदकिशोर राठी, डॉ. विजय जोशी, डॉ. नरेंद्र बहिरवार, समन्वयक दिपाली नागरे यांच्यासह दहाही झोनचे वैद्यकीय अधिकारी लसीकरण मोहिमेच्या प्रशिक्षण वर्गात सहभागी झाले होते.

## पं. दीनदयाल उपाध्याय जयंतीनिमित्त महापौरांनी केला ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार




नागपूर : पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त महापौर नंदा जिचकार यांनी प्रभाग क्र. ३७ मधील ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार केला. विशेष म्हणजे कार्यक्रमात येण्यास असमर्थ असलेल्या काही ज्येष्ठ व्यक्तींच्या घरी जाऊन त्यांचा गौरव केला.महापौर नंदा जिचकार यांनी स्वतः या 'गौरव सोहळ्याचे आयोजन बुटी ले-आऊट येथील सिद्ध गणेश मंदिरात केले होते. यावेळी प्रमुख वक्ता म्हणून माजी उपमहापौर तथा भाजपचे ज्येष्ठ नेते राजाभाऊ लोखंडे, प्रतापनगर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. शुक्ला उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण सभापती प्रा. दिलीप दिवे, क्रीडा समिती उपसभापती प्रमोद तभाने, गिरीश देशमुख, विमल श्रीवास्तव, गणेश मंदिर संस्थानचे अध्यक्ष नानासाहेब चिंचोळकर, सुनील अलोनी उपस्थित होते. यावेळी महापौर नंदा जिचकार व प्रमुख अतिथींच्या हस्ते ज्येष्ठ नागरिकांना शाल, श्रीफळ आणि अटलबिहारी बाजपेयी यांच्याशी संबंधित पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला. प्रमुख वक्त्यानी आपल्या भाषणातून ज्येष्ठाप्रती कृतज्ञता व्यक्त करीत आजच्या पिढीवर टाकलेल्या संस्कारबद्दल आभार मानले. ज्येष्ठ व्यक्तींचा अनुभव आणि मार्गदर्शन हे आम्हाला जगण्याची आणि परोपकाराची दिशा दाखविणारे असते. त्यांचा आदर सत्कार म्हणजे त्यांनी आमच्यावर केलेल्या उपकाराचे ऋण फेडण्यासारखे आहे, या शब्दात महापौर नंदा जिचकार यांनी ज्येष्ठाचा गौरव केला. कार्यक्रमात येऊ न शकलेल्या ज्येष्ठाचा सत्कार त्यांच्या घरी जाऊन करण्यात आला. संपूर्ण कार्यक्रमाच्या आयोजनात भारतीय जनता पार्टी प्रभाग क्र.३७ चे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सहकार्य केले.




## विसर्जन स्थळांना महापौरांनी दिली भेट

### व्यवस्थेची केली पाहणी : भक्तांशी साधला संवाद

नागपूर : नागपुरात रविवारी (ता. २३) पार पडलेल्या गणेश विसर्जनादरम्यान गणेशभक्तांना कुठलाही त्रास होऊ नये, महानगरपालिकेतर्फे करण्यात आलेल्या व्यवस्थेत काही अडचण तर नाही, ह्याची पाहणी करण्यासाठी महापौर नंदा जिचकार यांनी शहरातील विसर्जन स्थळांना भेट देऊन भक्तांशी संवाद साधला.सोनेगाव तलाव येथे महापौर नंदा जिचकार यांनी भेट दिली. यावेळी आमदार प्रा. अनिल सोले, अग्निशमन व विद्युत समितीचे सभापती लहुकुमार बेहते, अतिरिक्त आयुक्त रवींद्र ठाकरे, उपस्थित होते. येथील कृत्रिम तलावावर गणेश मूर्तींचे विसर्जन करण्यात येत होते. येथील व्यवस्थे संदर्भात काही सूचना देत भक्तांशी संवाद साधला. यानंतर महापौरांनी अंबाझरी तलाव, फुटाळा तलावाला भेट दिली. याठिकाणी मनपातील सत्तापक्ष उपनेत्या वर्षा ठाकरे होत्या. महापौर नंदा जिचकार यांनी येथे स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींशी संवाद साधत व्यवस्थेसंदर्भात विचारपूस केली. तेथून त्यांनी गांधीसागर तलावाला भेट दिली. येथील व्यवस्थेचीही त्यांनी पाहणी केली. याठिकाणी नगरसेवक प्रमोद चिखले उपस्थित होते. त्यानंतर त्यांनी सक्करदरा तलावाला भेट दिली. येथे आमदार सुधाकर कोहळे, नेहरूनगर झोन सभापती रिता मुळे व अन्य पदाधिकारी उपस्थित होते. गणेशमूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावात करावे, असे आवाहन या भेटीत महापौर नंदा जिचकार यांनी भक्तांना केले.

# 'जिका'च्या प्रमुखांची प्रतिनिधी मंडळासह मनपाला भेट

### नाग नदी प्रदूषण निर्मूलन प्रकल्पा'साठी जपान देणार अर्थसहाय्य : नोव्हेंबरमध्ये सुरु होणार सर्वेक्षण



नागपूर : 'नागनदी प्रदूषण निर्मूलन प्रकल्पा'ला जपानची वित्तीय संस्था 'जिका' अर्थसहाय्य करणार आहे. त्यादृष्टीने प्रकल्पाची सद्यस्थिती, प्रकल्प अहवाल आणि प्रकल्पातील अन्य बाबींवर चर्चा करण्यासाठी 'जिका' प्रमुख आणि चमू नागपुरात आली असून बुधवारी (ता. २६) आयुक्त सभा कक्ष प्रशासकीय इमारत सिव्हील लाईन येथे महापौर नंदा जिचकार, प्रभारी आयुक्त रवींद्र ठाकरे यांच्यासह प्रशासकीय अधिकाऱ्यांसोबत चर्चा केली.महापौर नंदा जिचकार यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या बैठकीला जिकाचे प्रमुख काटसू मॅटसुमोटो (घरींीं चरींींीं), जिकाचे भारतातील चीफ डेव्हलपमेंट स्पेशालिस्ट एम.पी. सिंग (च.झ. ड‌ळपसह), जिकाच्या प्रोग्राम स्पेशालिस्ट काओरी होंडा (ची. घरीळ केप्रवर), जिकाच्या ओजेटी हारुका कोयामा (ची. करींीझर घूरार) यांच्यासह मनपाचे प्रभारी आयुक्त रवींद्र ठाकरे, एनईएसएलचे संचालक डॉ. रिजवान सिद्दिकी, अतिरिक्त आयुक्त राम जोशी, अझीझ शेख, उपायुक्त डॉ. रंजना लाडे, राजेश मोहिते, मुख्य अभियंता मनोज तालेवार, तांत्रिक सल्लागार (नद्या व सरोवरे) मो. ईसराईल, नगररचना सहसंचालक प्रमोद गावंडे, मुंबई येथील एनजेएसचे संचालक विद्याधर सोनटक्के, कार्यकारी अभियंता अनिरुद्ध चौगंजकर, मोती कुकरेजा, मनोज गणवीर, राजेश भूतकर, मुख्य अग्निशमन अधिकारी राजेंद्र उचके, वित्त विभागातील अधिकारी विलास कावळे उपस्थित होते. प्रारंभी तांत्रिक सल्लागार (नद्या व सरोवरे) मो. ईसराईल यांनी नाग नदी प्रदूषण निर्मूलन प्रकल्पाची माहिती सादरीकरणाच्या माध्यमातून दिली. हा प्रकल्प महत्त्वाकांक्षी असून या प्रकल्पाच्या माध्यमातून शहरात चार सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प प्रस्तावित असल्याचे त्यांनी सांगितले. सन २०३४ पर्यंत नाग नदी सांडपाणीमुक्त होईल, असे उद्दिष्ट आहे. या प्रकल्पाला केंद्र शासनाने मंजुरी दिली असून केंद्र शासनाची अधिकृत वित्तीय संस्था 'जिका'द्वारे अर्थसहाय्य अपेक्षित असल्याचे ते म्हणाले. या संपूर्ण प्रकल्पाची माहिती घेतल्यानंतर जिकाचे प्रमुख काटसू मॅटसुमोटो यांनी प्रकल्प अहवाला काही गोष्टी समाविष्ट करण्याच्या सूचना केल्या. या प्रकल्पासाठी सेंट्रल मॉनिटरींग ण्ड कंट्रोल सिस्टीम असावी, घनकचरा व्यवस्थापनसंदर्भात काय उपाययोजना आहेत, त्याचे व्यवस्थापन कशा प्रकारे करण्यात येईल, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पासाठी जागेची उपलब्धता काय, ह्या संपूर्ण प्रकल्पावर महानगरपालिकेचे नियंत्रण असेल की एनईएसएलचे असेल याची संपूर्ण माहिती प्रकल्प अहवालात नमूद करण्याची सूचना त्यांनी केली. नोव्हेंबर २०१८ पर्यंत सर्वेक्षणासाठी चमूची नियुक्ती करून डिसेंबरमध्ये सर्वेक्षणाचे कार्य सुरू करण्याची सूचनाही त्यांनी केली. जपानची चमू सर्वेक्षणासाठी येईल, असेही त्यांनी सांगितले. सर्वेक्षणानंतर मंजुरीकरिता जपानहून एक स्वतंत्र चमू येईल. त्यांच्या मंजुरीनंतर जपान सरकारची अंतिम मंजुरी मिळेल. अंतिम मंजुरीनंतर अर्थसहाय्य देण्याच्या करारावर स्वाक्षऱ्या होतील. ही सर्व प्रक्रिया फेब्रुवारी २०१९ पर्यंत पूर्ण होईल, अशी माहिती जिकाचे प्रमुख काटसू मॅटसुमोटो यांनी दिली.

### केंद्राला ६० आणि राज्याला २५ टक्के

नाग नदी प्रदूषण निर्मूलन प्रकल्पाला 'जिका' ८५ टक्के अर्थसहाय्य करणार आहे. त्यापैकी केंद्र सरकारला ६० टक्के आणि राज्य सरकारला २५ टक्के अर्थसहाय्य करेल. केंद्र आणि राज्य सरकारकडून ने नागपूर महानगरपालिकेला देण्यात येईल. १५ टक्के वाटा हा नागपूर महानगरपालिकेचा असेल.

### प्रस्तावित एसटीपी च्या जागांना भेट

नागपूर महानगरपालिकेतर्फे राबविण्यात येणाऱ्या नागनदी प्रदूषण निर्मूलन प्रकल्पांतर्गत असलेल्या प्रस्तावित एसटीपी प्रकल्पाच्या जागांना 'जिका'चे प्रतिनिधी मंडळाने भेट दिली. सर्वप्रथम नाग नदीचे उगमस्थान असलेल्या अंबाझरी ओव्हरफ्लो प्वाईंटला भेट दिली. त्यानंतर सीताबर्डी, संगम चाळ येथील प्रस्तावित जागांना भेटी दिल्या.

# लठ्ठपणापासून सुटकेसाठी मानसिकता बदला : डॉ. जगन्नाथ दीक्षित



### 'लठ्ठपणा व मधुमेह प्रतिबंधाचा सोपा उपाय'वर व्याख्यान

नागपूर : लठ्ठपणा ही जगातील मोठी समस्या आहे. जगभरातील लोक लठ्ठपणामुळे त्रस्त आहेत. एका सर्वेक्षणानुसार भारतात ९८ लाख पुरूष तर २ कोटी महिला लठ्ठपणाचे शिकार आहेत. मधुमेहाचे कारणही लठ्ठपणाच आहे. लठ्ठपणाचे कारण अनेक असले तरी तो कसा दूर करायचा यासाठी स्वत:ची मानसिकता बदलणे आवश्यक आहे. कुणीतरी दुसरा येऊन आपला लठ्ठपणा दूर करेल ही मानसिकता आपण जोपर्यंत बदलणार नाही, तोपर्यंत लठ्ठपणा दूर करता येणार नाही, असे प्रतिपादन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे जनऔषधवैद्यक शास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. जगन्नाथ दीक्षित यांनी केले.ते नागपूर महानगरपालिका, सप्तक व माहेश्वरी पंचायतच्यावतीने डॉ. श्रीकांत जिचकार यांच्या जयंतीनिमित्त रेशीमबाग येथील कविवर्य सुरेश भट सभागृहात आयोजित 'लठ्ठपणा व मधुमेह प्रतिबंधाचा सोपा उपाय' या विषयावर आयोजित व्याख्यानात बोलत होते. याप्रसंगी नागपूर महानगरपालिकेचे आरोग्य समिती सभापती मनोज चापले, उपायुक्त रविंद्र देवतळे, उपायुक्त राजेश मोहिते, सहायक आयुक्त राजेश कराडे, आरोग्य अधिकारी अनिल चिव्हाणे, डॉ. विजय जोशी आदी उपस्थित होते. डॉ. जगन्नाथ दीक्षित पुढे म्हणाले, अनुवांशिकता, वय, सामाजिक व आर्थिक स्थिती, जेवण बनविण्याच्या पद्धती, शिक्षण, मद्यपान, धुम्रपान अशा विविध कारणांमुळे वजन वाढतो अशी आपली धारणा आहे. वाढलेले वजन कमी करण्यासाठी आज जगात २४७ प्रकारचे 'डायट प्लॅन' आहेत. मात्र एका वेळेसाठीच ते ठिक वाटतात. आज आपली मानसिकता 'शॉर्ट कट'ची झाली आहे. त्यामुळे वजनही झटपट कमी व्हावे असेच आपल्याला वाटते. मात्र त्यासाठी महागडे 'डायट प्लॅन' किंवा इतर बाबतीत पैसा खर्च करण्याची गरज नाही. रक्तात इन्सुलिनचे असते त्यामुळे लठ्ठपणा वाढतो व लठ्ठपणामुळे मधुमेह होतो. त्यामुळे लठ्ठपणा कमी करणे हे सर्वप्रथम आवश्यक आहे. विना पैशानेही लठ्ठपणा घालविता येतो. यासाठी फक्त आधी मनाची तयारी करणे आवश्यक आहे, असेही ते म्हणाले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नागपूर महानगरपालिकेसह, सप्तक व माहेश्वरी पंचायतच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.


## 'सिंहासन', 'जैत रे जैत' यासारखे चित्रपट सामान्यांसाठी प्रेरणादायी : महापौर

### डॉ. जब्बार पटेल चित्रपट महोत्सवाला सुरूवात

नागपूर : सिंहासन, जैत रे जैत यासारखे चित्रपट सामान्य रसिकांसाठी प्रेरणादायी ठरलेली आहे. यापुढेही ठरतीलच, असा विश्वास महापौर नंदा जिचकार यांनी व्यक्त केला. नागपूर महानगरपालिका, ऑरेंज सिटी कल्चरल फांऊडेशन, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने नागपुरात डॉ. जब्बार पटेल चित्रपटांच्या महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले.यावेळी व्यासपीठावर नागपूर महानगरपालिकेचे उपायुक्त रवींद्र देवतळे, नागपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.यादव, सुप्रसिद्ध दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल, सुभाष आळेकर, समर नखाते, सुप्रसिद्ध मेंदूरोग तज्ज्ञ डॉ.चंद्रशेखर मेश्राम प्रामुख्याने उपस्थित होते. पुढे बोलताना महापौर म्हणाल्या, सिंहासन हा राजकीय जीवनावर आधारित चित्रपट, मुक्ता हा समाजकारणबोध चित्रपट रसिकांच्या एक वेगळी छाप टाकतो आहे. चित्रपट, नाटक, माहितीपट यामध्ये त्यांचे योगदान अतुलनीय आहे. त्यांच्या चित्रपटांचा महोत्सव म्हणजे नागपूरकर जनतेसाठी एक वेगळी पर्वणीच आहे, असेही त्या यावेळी बोलताना म्हणाल्या. ८ व ९ सप्टेंबर रोजी हा चित्रपट आयोजित करण्यात आला असून शनिवारी उद्घाटनानंतर सिंहासन हा चित्रपट दाखविण्यात आला. त्यांनतर या चित्रपटामागील पार्श्वभूमी व माहिती डॉ. जब्बार पटेल यांनी दिली. सायंकाळी ६ वाजता समाजकारणप्रबोधनपर चित्रपट मुक्ता हा चित्रपट दाखविण्यात आला. प्रारंभी सुप्रसिद्ध मेंदूरोग तज्ज्ञ डॉ.चंद्रशेखर मेश्राम यांनी प्रास्ताविकाद्वारे या चित्रपट महोत्सवाची माहिती सांगितली. उपायुक्त रवींद्र देवतळे यांनी मान्यवरांचे स्वागत केले.




### अग्निशमन व विद्युत विशेष समिती सभापती लहुकुमार बेहते यांचे निर्देश



## अग्निशमन नियमांचे पालन न करणाऱ्यांवर कारवाई करा!

नागपूर : महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियमांतर्गत अग्निशमन विभागाच्या नियमांचे पालन न करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करा, असे निर्देश अग्निशमन व विद्युत विशेष समिती सभापती लहुकुमार बेहते यांनी दिले.अग्निशमन व विद्युत संबंधित विषयांवर चर्चा करण्यासाठी आयोजित बैठकीत समितीच्या उपसभापती वर्षा ठाकरे, सदस्य निशांत गांधी, वंदना भुरे, वनिता दांडेकर, अनिल गेंडरे, आशा उईके, ममता सहारे, उपायुक्त नितीन कापडणीस, मुख्य अग्निशमन अधिकारी राजेंद्र उचके, उपमुख्य अग्निशमन अधिकारी बी.पी. चंदनखेडे, उपअभियंता (प्रकल्प) शकील नियाजी, धनंजय मेंडुलकर, उपअभियंता (विद्युत) ए.एस. मानकर, कनिष्ठ अभियंता प्रकाश रूद्रकार, सामान्य प्रशासन विभागाचे निगम अधीक्षक मदन सुभेदार यांच्यासह सर्व अग्निशमन स्थानक अधिकारी उपस्थित होते. यावेळी अग्निशमन व विद्युत विशेष समिती सभापती लहुकुमार बेहते म्हणाले, महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाय योजना अधिनियमांतर्गत व्यावसायिक दुकाने, हॉटेल, मॉल आदींसह निवासी इमारतींमध्ये अग्निशमन सुविधा असणे अनिवार्य आहे. यासंबंधी तपासणी करून ज्या इमारतींमध्ये अग्निशमन सुविधा नसेल त्या इमारतींमधील पाणी व विद्युत पुरवठा खंडीत करण्याचे अग्निशमन व विद्युत विशेष समिती सभापती लहुकुमार बेहते यांनी निर्देशित केले. अग्निशमन विभागाकडे असलेल्या १८३१ इमारत धारकांना टप्प्याटप्प्याने नोटीस जारी करण्यात यावे. कारवाईमध्ये व्यावसायिक प्रतिष्ठानांना सुरूवातीला प्राधान्य देण्यात यावे, त्यामुळे सर्वसामान्य नागरिक आपल्या इमारतींमध्ये अग्निशमन सुविधा लावून घेता येईल, असेही ते म्हणाले. त्रिमूर्तीनगर येथे बांधकाम सुरू असलेल्या अग्निशमन स्थानकावरील डीपी नुकतीच स्थानांतरित करण्यात आली. मात्र या स्थानावरील बांधकामाला गती मिळावी, यासाठी अडथळे दुर करून सदर स्थानक येत्या नोव्हेंबरपर्यंत पूर्णत्वास नेण्याचे निर्देशही यावेळी सभापती लहुकुमार बेहते यांनी दिले.

# मनपा कर्मचाऱ्यांना कार्यक्षमता वृद्धीचे प्रशिक्षण

### ऑक्टोबर अखेरपर्यंत होणार ४२५ कर्मचारी प्रशिक्षित



नागपूर : दररोज नागरिकांशी संबंध येणाऱ्या नागपूर महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वृद्धींगत व्हावी, व्यक्तिमत्त्व विकास व्हावा, सोबतच कायदा आणि सुव्यवस्थेचे ज्ञान मिळावे यासाठी राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत नागपूर महानगरपालिकेतील सुमारे ४२५ कर्मचारी आक्टोबर अखेरपर्यंत प्रशिक्षित होणार आहेत. ४५ कर्मचाऱ्यांच्या दुसऱ्या तुकडीचे पाच दिवसीय प्रशिक्षण सध्या येथील वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्थेत (वनामती) येथे सुरू आहे. यात लिपिकीय तथा तांत्रिक संवर्गातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.सदर प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन मनपा स्थायी समितीचे सभापती वीरेंद्र कुकरेजा यांच्या हस्ते पार पडले. तर पहिल्या तुकडीच्या समारोपाला उपमहापौर दीपराज पार्डीकर यांच्यासह प्रभारी आयुक्त रवींद्र ठाकरे, अपर आयुक्त राम जोशी, अझीझ शेख, उपायुक्त नितीन कापडणीस उपायुक्त रवींद्र देवतळे, राजेश मोहिते, सहायक आयुक्त (सामान्य प्रशासन) महेश धामेचा यांची उपस्थिती होती. नागपूर महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांसाठी पहिल्यांदाच अशा प्रकारच्या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले असून दररोज संपर्कात येणाऱ्या नागरिकांशी संवाद साधताना तो कसा असावा, त्यातून नागरिकांचे समाधान कसे होईल, याचे प्रशिक्षण महानगरपालिकेकडे नागरिकांचा बघण्याचा दृष्टीकोन बदलण्यात सहाय्यभूत ठरेल, असे प्रतिपादन सभापती वीरेंद्र कुकरेजा यांनी केले. उपमहापौर दीपराज पार्डीकर यांनीही अशा प्रशिक्षणासाठी पुढाकार घेतल्याबद्दल महापालिका प्रशासनाचे अभिनंदन केले. दुसऱ्या तुकडीचे प्रशिक्षण २५ ते २९ ऑक्टोबरदरम्यान सुरू आहे. या प्रशिक्षण शिबिराला गुरूवारी (ता. २७) विरोधी पक्ष नेते तानाजी वनवे, प्रभारी आयुक्त रवींद्र ठाकरे, अपर आयुक्त राम जोशी, धरमपेठ झोन सभापती प्रमोद कौरती, स्थापत्य व प्रकल्प समितीचे सभापती संजय बंगाले, सहायक आयुक्त (सामान्य प्रशासन) महेश धामेचा यांनी भेट देऊन प्रशिक्षणार्थ्यांशी संवाद साधला. अशा प्रकारच्या प्रशिक्षणाने आमच्यातील कार्यक्षमता नक्कीच वाढेल, सोबतच कामाकडे बघण्याचा आमचा दृष्टीकोन यामुळे बदलला असल्याचे मत प्रशिक्षणार्थ्यांनी मांडले. याप्रसंगी प्रशिक्षणार्थ्यांशी संवाद साधताना विरोधी पक्ष नेते तानाजी वनवे म्हणाले, मनपात कार्य करताना नागरिकांशी सरळ संबंध येतो. कधी-कधी संयमाचा बांधही फुटतो. मात्र अनुभवातून माणूस शिकत जातो. अनुभवाला प्रशिक्षणाची जोड मिळाली तर कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढून मनपाच्या सेवा अधिक प्रभावीपणे नागरिकांना मिळतील. प्रशिक्षणानंतर कर्मचारी अधिक ऊर्जेने काम करेल, असे प्रतिपादन त्यांनी केले.